## समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

### समग्र शिक्षा मधील उपक्रम (२०२५-२६)

- मोफत पाठ्यपुस्तके
- संयुक्त शाळा अनुदान
- अपंग मुलांच्या शिक्षणाची सोय (IE)
- गट साधन केंद्र
- समूह साधन केंद्र
- शाळाबाह्य मुलांचे शिक्षण
- बांधकाम
- कॅल लॅब व आयसीटी लॅब
- मोफत गणवेश
- निपुण भारत

समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

## मोफत पाठयपुस्तके  योजना

**उद्देश - मोफत पाठ्यपुस्तक ही योजना** शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्था,शासन अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ. १ ली ते इ. ८ वी च्या वर्गात शिकणा-या सर्व विद्यार्थ्यांना अनुज्ञेय आहे. विद्यार्थ्यांना शाळेचे नवे शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर शाळांमधून मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात येते.

- **प्राथमिक वर्ग** इ. १ ली ते इ. ५ वी करिता प्रती लाभार्थी सरासरी रु. २५० /- याप्रमाणे तसेच उच्च प्राथमिक वर्ग इ. ६ वी ते इ. ८ वी करिता प्रती लाभार्थी सरासरी रु. ४०० /- याप्रमाणे तरतूद मंजूर आहे.
- **शैक्षणिक वर्ष** २०२५-२६ - मध्ये ४०७०६७ विद्यार्थ्यांना २३७४३३७ पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे.

## समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

## संयुक्त शाळा अनुदान

**उद्देश** - समग्र शिक्षा अंतर्गत संयुक्त शाळा अनुदान हे शासकीय आदिवासी विकास विभागाकडून चालविलेल्या आश्रमशाळा, समाजकल्याण विभागाकडून चालविलेल्या शाळा, विद्यानिकेतन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा (जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, कटकमंडळे इ.) साठी मंजूर आहे.

अ) इयत्ता ८ वी पर्यंतचे वर्ग असलेल्या शासकीय प्राथमिक शाळांसाठी मंजूर संयुक्त शाळा अनुदान

| अ.क्र. | विद्यार्थी पट संख्या | प्रति शाळा मंजूर तरतूद ( लाखामध्ये) |
|---|---|---|
| १ | ०१ ते १५ (स्वच्छ कार्ययोजनेच्या १० टक्के मंजूर तरतुदीसह) | ०.१० |
| २ | १५ ते ३० (स्वच्छ कार्ययोजनेच्या १० टक्के मंजूर तरतुदीसह) | ०.२५ |
| ३ | ३१ ते ६० (स्वच्छ कार्ययोजनेच्या १० टक्के मंजूर तरतुदीसह) | ०.२५ |
| ४ | ६१ ते १०० (स्वच्छ कार्ययोजनेच्या १० टक्के मंजूर तरतुदीसह) | ०.२५ |
| ५ | १०१ ते २५० (स्वच्छ कार्ययोजनेच्या १० टक्के मंजूर तरतुदीसह) | ०.५० |
| ६ | २५१ ते १००० (स्वच्छ कार्ययोजनेच्या १० टक्के मंजूर तरतुदीसह) | ०.७५ |
| ७ | १००० पेक्षा जास्त | १.०० |

खालील प्रमाणे मंजूर असलेल्या संयुक्त शाळा अनुदानाचा विनियोग शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन विनियोग करण्यात येतो.

१. शाळा व्यवस्थापन समितीने शाळांची गरज लक्षात घेऊन सदर शाळा अनुदानाचा विनियोग करण्यात येतो.

२. संयुक्त शाळा अनुदानाचा विनियोग हा शाळेतील नादुरुस्त असलेल्या लाईट, पंखे, खिडक्या, खेळाचे मैदान दुरुस्त करणे तसेच इतर आवर्ती खर्च उदा. खेळाचे साहित्य दुरुस्ती, विज्ञान प्रयोगशाळा साहित्य खरेदी, शाळेचे वीज बील, इंटरनेट, पाण्याची सुविधा, वार्षिक देखभाल- शाळा इमारत दुरुस्ती, शौचालये दुरुस्ती आणि इतर भौतिक सुविधा सुस्थितीत ठेवण्यासाठी करता येईल. भारत सरकारच्या स्वच्छताविषयक मोहिमेच्या अनुषंगाने “स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय” याकामी शौचालयाची स्वच्छता व सुविधा, शौचालयासाठी पाण्याची उपलब्धता करणे इ. बाबींसाठी या अनुदानाचा विनियोग करावा. याकामी मंजूर असलेल्या एकूण निधीच्या १० टक्के निधी हा स्वच्छ कार्य योजना या उपक्रमावर खर्च करण्यात येतो.

३. वरील बाबींसाठी समाज सहभाग घेण्यात येतो.

# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

## समावेशित शिक्षण (IE)

**उद्दिष्टे**

- 0 ते 18 वर्ष वयोगटाच्या विशेष गरजा धारक विद्यार्थ्यांचा शोध व निदान करणे.
- विशेष गरजा धारक मुलांची वैद्यकीय तपासणी करून उपचारासाठी दिशा ठरवणे.
- विशेष गरजा धारक मुलांना नियमित शाळेत शिक्षणासाठी संधी उपलब्ध करून देणे.
- विशेष गरजा धारक मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यास साहाय्य करणे.
- समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभागासाठी सक्षम करणे.
- अडथळा विरहित संचारणासाठी बांधकामातील अडथळे दूर करणे.

**योजना कोणासाठी**

0 ते 18 वर्षाची, इयत्ता पहिली ते बारावी पर्यतची विशेष गरजा असलेले मुले
1. अंध 2. मंद दृष्टी 3. कर्णबधिर 4. वाचा दोष 5. अस्थिव्यंग 6. मानसिक आजार 7. अध्ययन अक्षम 8. मेंदूचा पक्षाघात 9. स्वमग्न 10. बहुविकलांग 11. कुष्ठरोग निवारीत 12. बुटकेपणा 13. मतिमंद 14. मस्कुलर डिस्ट्रॉफी 15. मेंदू व मनका आजार 16. मल्टिपल स्क्लेरॉसिस 17. थॅलेसेमिया 18. हिमोफेलिया 19. सिकल सेल 20. ऍसिड अटॅक विक्टिम 21. परकिंग्सन

**उपक्रम**

- **प्रवास भत्ता** - विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थ्यांना घरापासुन शाळेपर्यंत जास्त अंतर असणे, संसाधन कक्ष येणे जाणे, थेरेपीसाठी जाणे इ. कारणांसाठी प्रतिमाह रु.६००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी प्रवास भत्ता अनुदान प्राप्त प्रस्तावानुसार संबंधितांच्या बँक खात्यावर देण्यात येतो.
- **मदतनिस भत्ता** - विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थ्यांना घरापासुन शाळेपर्यंत, थेरेपीसाठी नेणे आणण्यासाठी प्राप्त प्रस्तावानुसार मदतनीसास प्रतिमाह रु.६००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी मदतनीस भत्ता अनुदान प्राप्त प्रस्तावानुसार संबंधितांच्या बँक खात्यावर देण्यात येतो.
- **प्रोत्साहन भत्ता** - इ. १ ली ते १२ वी च्या विशेष गरजा धारक विद्यार्थीनींसाठी मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढावे यासाठी प्रतिमाह रु.२००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी प्रोत्साहन भत्ता संबंधितांच्या बँक खात्यावर देण्यात येतो.
- **वाचक भत्ता** - शाळेतील पूर्णतः अंध व अंशतः अंध विद्यार्थ्यांना शाळेतील पाठयपुस्तके व संदर्भीय पुस्तकांमधील संकल्पना स्वतंत्रपणे समजाव्यात, अशा वेळी वाचकाची गरज असल्यास अशा

विद्यार्थ्यांना प्रतिमाह रु.२००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी वाचक भत्ता संबंधितांच्या बँक खात्यावर देण्यात येतो.

**साहित्य साधने -** (आवश्यकतेनुसार पूर्व प्रथामिकस्तर प्रति रु.३०००/- प्राथमिकस्तर प्रति रु. ५५००/- व माध्यमिकस्तर प्रति रु. ६०००/-)

- **मॉडिफाय चेअर** - हलन चलनास समस्या असणाऱ्या तीव्र स्वरूपाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेत अनुकूलीत बैठक व्यवस्था करण्यासाठी तालुकास्तरावरून साहित्य उपलब्ध करून दिले जाते.
- **ब्रेल बुक -** पाठ्यपुस्तकावर आधारीत ब्रेल पुस्तके अंध विद्यार्थ्यांना तालुकास्तरावरून उपलब्ध करून दिले जातात.
- **लार्ज प्रिंट -** पाठ्यपुस्तकावर आधारीत ठळक अक्षरातील (मोठ्या अक्षरातील) पुस्तके मंददृष्टी विद्यार्थ्यांना तालुकास्तरावरून उपलब्ध करून दिले जातात.
- **इतर साहित्य -** तालुकास्तरीय शिबीरातून साहित्यासाठी संदर्भित विद्यार्थ्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कुबड्या, व्हील चेअर, रोलेटर, ट्रायसिकल, कॅलिपर, श्रवणयंत्र, सीपी चेअर, ब्रेल किट, स्मार्ट केन, डेझी प्लेअर इ. साहित्य उपलब्ध करून दिले जातात.
- **वैद्यकीय निदान व उपचार शिबिरे -** तालुका / जिल्हा स्तरावर निदान व उपचार शिबिरे आयोजित करण्यासाठी निधी देण्यात येतो.

सबका साथ सबका विकास
शिक्षा
अच्छी शिक्षा

## समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

# गटसाधन केंद्र सादील अनुदान

**उद्देश** – गटसाधन केंद्रावरील आवश्यक स्टेशनरी झेरॉक्स ,वीज बील आकस्मिक खर्च करता येणे.

प्रती गटसाधन केंद्र रु. २७०००/- प्रमाणे एकूण तरतूद रु. ४.२० लाख वितरीत करण्यात येतात व रु. ०.४२ लाख जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांना वितरीत करण्यात येतात.

## गटसाधन केंद्र बैठक,प्रवास भत्ता अनुदान

**उद्देश** – १) गटसाधन केंद्रातील शैक्षणिक माहितीचे संकलन करणे.

२) गटसाधन केंद्रातील शिक्षण विषयक प्रश्न ओळखणे

३) शैक्षणिक साहित्याचा संग्रह करणे,उपयोगात आणणे.

४) नवनवीन प्रयोग ,अध्ययन पध्दती वापरणे.

५) शिक्षकांचे सक्षमीकरण करणे,सनियंत्रण आणि मूल्यमापन हाती घेणे.

प्रती गटसाधन केंद्र रु. ३००००/- प्रमाणे एकूण तरतूद रु. ४.२० लाख वितरीत करण्यात आली आहे.

## समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

### समुहसाधन केंद्र सादील अनुदान

**उद्देश** – समुहसाधन केंद्रावरील आवश्यक स्टेशनरी झेरॉक्स ,वीज बील आकस्मिक खर्च करता येणे.

प्रती समुहसाधन केंद्र रु.१५०००/- प्रमाणे एकूण तरतूद रु. ३७.५० लाख वितरीत करण्यात येतात.

### समुहसाधन केंद्र बैठक,प्रवास भत्ता अनुदान

**उद्देश** – १) समुह साधन केंद्रातील शैक्षणिक माहितीचे संकलन करणे.

२) समुह साधन केंद्रातील शिक्षण विषयक प्रश्न ओळखणे

३) शैक्षणिक साहित्याचा संग्रह करणे,उपयोगात आणणे.

४) नवनवीन प्रयोग ,अध्ययन पध्दती वापरणे.

५) शिक्षकांचे सक्षमीकरण करणे,सनियंत्रण आणि मूल्यमापन करणे.

प्रती समुहसाधन केंद्र रु. १५०००/- प्रमाणे एकूण तरतूद रु.३७.५० लाख वितरीत करण्यात येतात.

# पर्यायी शिक्षण

**उद्देश -** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू करण्यात आला आहे. सदर कायदयाच्या अनुषंगाने राज्य नियमावली २०११ तयार केली असून ती दिनांक ११ ऑक्टोंबर २०११ पासून राज्यात लागू केली आहे. त्यामधील तरतूदीनूसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालक प्राथमिक शाळेत दाखल केले पाहिजे. परंतु यामध्ये स्थलांतर तसेच आजारपण व वय जास्त यांसारख्या कारणांमूळे मुले शाळाबाहय होतात. यासाठी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पुढील योजना सुरु आहेत.

## शाळाबाहय व स्थलांतरीत विदयार्थी : (Out of School & Migrated Children)

शाळाबाहय झालेल्या विदयार्थ्यांना शाळेत वयानुरुप वर्गात दाखल केले जाते. त्यासाठी त्या विदयार्थ्यांना तीन महिने, सहा महिने असे विशेष प्रशिक्षण देवून वयानुरुप वर्गात दाखल करुन त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. साधारणपणे ऑक्टोबर ते मार्च या सहा महिन्याच्या कार्यकाळामध्ये पालकांचे व्यवसायानिमित्त किंवा काही कामधंदयानिमित्त स्थलांतर होत असते. त्यांच्याबरोबर त्यांचे मुलही स्थलांतर करत असतात. त्यामुळे मुले शाळाबाहय होतात. या विदयार्थ्यांना ज्या ठिकाणी स्थलांतर झाले आहे त्या ठिकाणच्या नजीकच्या शाळेमध्ये त्यांना प्रवेश दिला जातो. त्यांच्या प्रगतीची नोंद शिक्षण हमी कार्डवर घेतली जाते.

## वाहतूक भत्ता (Transport Allowance) :

६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन सुविधा किंवा अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. विदयार्थ्यांना त्यांच्या नजीकच्या नियमित प्राथमिक / उच्च प्राथमिक शाळेत येण्या-जाण्यासाठी एस.टी. ची सोय अथवा मासिक एस.टी. पासची सोय ज्या ठिकाणी उपलब्ध नसेल तेथे अधिकृत खाजगी वाहनाची सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाकडून वाहतूकीकरीता अनुदान १० महिन्यासाठी पुरविण्यात येते.

## शाळा प्रवेशोत्सव :

RTE २००९ नुसार प्रत्येक बालकाचे नाव पटावर नोंदवले जाणे आवश्यक आहे. पटावर नोंदविले गेलेले प्रत्येक बालक दररोज शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क आता कायदयाने मान्य केला आहे.

दीर्घ सुटटीच्या आनंदानंतर विद्यार्थ्यांना शाळा हवीहवीशी वाटली पाहिजे. साधारणपणे दि.१५ जून रोजी (विदर्भ वगळता) राज्यात शाळा प्रारंभ होत असते. हा प्रारंभ चैतन्यमय व उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळते यासाठी जिल्हयात शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जातो. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले जाते. त्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, प्रभातफेरी, शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तक वितरण, मोफत गणवेश, विद्यार्थ्यांना फुले देणे यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

# बांधकाम

**उद्देश :**

1. तालुक्याच्या ठिकाणी गट साधन केंद्राचे व केंद्राच्या ठिकाणी समूह साधन केंद्राचे बांधकाम करणे
2. गरजेनुसार वर्गखोल्यांचे बांधकाम ग्रामशिक्षण समिती मार्फत पूर्ण करणे
3. मोडकळीस आलेल्या व दुरुस्ती पलीकडे गेलेल्या शाळागृहाचे जागी नवीन शाळांचे इमारत बांधकाम
4. नवीन शाळा उघडल्याचे ठिकाणी नवीन शाळा इमारतीचे बांधकाम करणे
5. शाळेला इमारत नसल्यास नवीन शाळागृहांचे बांधकाम
6. शाळेचा परिसर आकर्षक आणि आनंददायी बनविण्याच्या दृष्टिने वर्गखोल्यांची आयताकृती आकारात बांधणी करणे
7. गरजेनुसार संरक्षक भिंतीचे बांधकाम
8. सर्व बांधकामाची गुणवत्ता व टिकाऊपणासाठी स्थानिक समाजाचा सहभाग घेणे
9. स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व विद्युत इ. सोयी करणे

**शाळाखोली बांधकामातील घटक :**

1. शाळा खोलीमध्ये मुलांना बसवण्यासाठी भिंतीलगत (फळयाच्या भिंती व्यतिरिक्त) बाकडयांचे बांधकाम
2. विद्यार्थ्यांसाठी खडू-फळा
3. जमिनीवर भौमितिक आकृत्या
4. शैक्षणिक कोपरे
5. भिंतीमधील कपाट
6. भिंतीवरील प्रदर्शनीय फलक लावण्याकरीता हुक असलेल्या लाकडी पटटया
7. दुरदर्शन संच ठेवण्यासाठी कडप्पा

**बाहयघटक :**

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प, मैदान, ॲम्पीथिएटर, घसरगुंडी, वाळूचे मैदान, शाळेच्या आवारातील वर्गाबाहेरचा खडू-फळा, शाळेच्या आवारात झाडे असल्यास झाडांभोवती चबुतऱ्याचे बांधकाम.

बांधकामाचे प्रामुख्याने खालील प्रकारांचा अंतर्भाव आहे.

1. गट साधन केंद्र
2. समूह साधन केंद्र
3. नविन प्राथमिक शाळा खोल्या

4. नविन उच्च प्राथमिक शाळा खोल्या
5. इमारत विरहीत प्राथमिक शाळा खोल्या
6. इमारत विरहीत उच्च प्राथमिक शाळा खोल्या
7. मोडकळीस प्राथमिक शाळा खोल्या
8. मोडकळीस उच्च प्राथमिक शाळा खोल्या
9. अतिरिक्त शाळा खोल्या
10. स्वच्छतागृह
11. पाणी पुरवठा
12. विद्युतीकरण
13. संरक्षक भिंत

## बांधकाम कार्यपध्दती

**1) प्रशासकीय मान्यता :**

समग्र शिक्षा अंतर्गत शाळास्तरावरुन यु-डायस प्लस या ऑनलाईन प्रणालीमध्ये बांधकामाची आवश्यकता असणाऱ्या शाळा खोल्यांची मागणी ऑनलाईन पध्दतीने नोंदविली जाते. सदर प्राप्त माहितीच्या आधारे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडून आवश्यकता असणाऱ्या शाळा खोल्यांची यु-डायस प्लस क्रमांक व नावानिशी प्रशासकीय मान्यता दिली जाते.

**2) तांत्रिक मान्यता :**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडून प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर मान्यता प्राप्त शाळा खोल्यांचे अंदाजपत्रक तयार केले जाते. सदर अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, समग्र शिक्षा यांचेकडून तांत्रिक मान्यता दिली जाते.

**3) करारनामे :**

उपरोक्त बाबींची पूर्तता झाल्यानंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेवतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अथवा आयुक्त / मुख्याधिकारी (महानगरपालिका / नगरपालिका) किंवा त्यांचा प्रतिनिधी, गटशिक्षणाधिकारी / ग्रामशिक्षण समिती यांच्यामध्ये बांधकामाचा करारनामा साक्षीदारांच्या उपस्थितीत व स्वाक्षरीने केला जातो.

**4) अग्रीम वितरण :**

**करारनामा** झाल्यानंतर खालीलप्रकारे निधींचे वितरण केले जाते.

| **हप्ता** | **केव्हा दयावयाचा** | **किती दयावयाचा** |
|---|---|---|
| पहिला | करार नाम्यावर सहया झाल्यावर | निव्वळ बांधकाम रकमेच्या 50 टक्के |
| दुसरा | बांधकामाचे छत टाकून झाल्यानंतर | निव्वळ बांधकाम रकमेच्या 45 टक्के |
| अंतिम | बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व अग्रीम समायोजनांचे प्रस्ताव दिल्यानंतर | निव्वळ बांधकाम रकमेच्या 5 टक्के |

बांधकामावर तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी कनिष्ठ अभियंता (समग्र) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

## कॅल लॅब आणि आयसीटी लॅब

**उद्देश** - स्थानिक स्वराज्य संस्थाच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये कॅल लॅब (संगणक प्रयोगशाळा) तसेच अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये आयसीटी लॅब स्थापन करुन उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण, शैक्षणिक आज्ञावली इ. माध्यमातून तसेच संगणकाच्या मदतीने शिक्षण देण्यासाठी सदर कॅल लॅब चा प्रभावीपणे वापर करणे.

समग्र शिक्षा अभियानामध्ये (पूर्वीचे सर्व शिक्षा अभियान) कॅल लॅब उपक्रम (संगणक प्रयोगशाळा) अंतर्गत सन २०१७-१८ पर्यंत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या १९६ जि प उच्च प्राथमिक शाळांमध्ये कॅल लॅब (संगणक प्रयोगशाळा) स्थापित करण्यात आलेल्या होत्या. त्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाच्या स्तरावर मार्गदर्शक सूचनांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या उच्च प्राथमिक शाळांची निवड महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाने केली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामधील उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण, शैक्षणिक आज्ञावली इ. माध्यमातून तसेच संगणकाच्या मदतीने शिक्षण देण्यासाठी सदर कॅल लॅब चा प्रभावी वापर होतो. तसेच उच्च प्राथमिक शाळांमध्ये सन २०२५-२६ मध्ये हा उपक्रम राबविणेबाबत अद्याप मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाकडून अप्राप्त आहे.

**आयसीटी लॅब** - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची एप्रिल २०१० पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक ६ ते १४ वयोगटातील मुलांस गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी शासनाने विविध कार्यक्रम सुरू केले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये ऑनलाईन संसाधने आणि सहयोगाने शिक्षण शिकण्याची प्रक्रिया समृद्ध करण्यासाठी डिजिटल

अध्यापनशास्त्राच्या वापरावर भर देण्यात आला आहे. सन २०२४-२५ या वर्षामध्ये समग्र शिक्षा योजनेच्या ICT उपक्रमांतर्गत राज्यातील म.प्रा.शि.प. (MPSP) मुंबई कार्यालयाने निवडलेल्या राज्यातील ३०९ प्राथमिक व माध्यमिक शाळांपैकी अहिल्यानगर जिल्ह्यातील म.प्रा.शि.प. मुंबई कार्यालयाने निवडलेल्या एकुण ०३ शाळांचा समावेश आहे. प्राथमिक व माध्यमिक ०३ शाळांमधील इयत्ता १ ली ते १२ वीचे शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थी यांना याचा उपयोग होत आहे. ICT लॅबची निर्मिती करतांना तांत्रिक तपशीलानुसार मंजूर असलेल्या ०३ शाळांमध्ये १० संगणक (Thin Client) आणि १ Server यामध्ये १) E-Content and Digital Resources २) Charges for Electricity ३) Internet connectivity ४) Instructional expenses (५) Training of teachers ६) Monitoring and supervision expenses for tracking usage of hardware and software/content इ. याप्रमाणे साहित्य मप्राशिप, मुंबई कार्यालयामार्फत उपलब्ध करून देण्यात आले आहे. सन २०२५-२६ मध्ये हा उपक्रम राबविणेबाबत अद्याप मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाकडून अप्राप्त आहे.

सबका साथ सबका विकास
समग्र शिक्षा
सबको शिक्षा अच्छी शिक्षा

# समग्र शिक्षा , शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहिल्यानगर

**शालेय गणवेश, बूट पायमोजे योजना समग्र शिक्षा जिल्हा परिषद अहिल्यानगर २०२५-२६**

**योजना -** सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शालेय गणवेश साठी समग्र शिक्षा+पीएमश्री+राज्य गणवेश अंतर्गत गणवेश योजनेतील गणवेश पात्र विद्यार्थ्यांकरिता गणवेश व एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजे साठी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

**लाभार्थी-** इयत्ता १ ली ते ८ वी चे शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थी

**कार्यवाही-**सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात समग्र शिक्षा+पीएमश्री+राज्य गणवेश अंतर्गत गणवेश योजनेतील गणवेश पात्र विद्यार्थ्यांकरिता दोन गणवेश संच व एक जोडी बूट व दोन जोडी पायमोजे साठी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

शासन निर्णय दि.०२/०४/२०२५ नुसार शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन गणवेश ,बूट व पायमोजे वितरण करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

सबका साथ सबका विकास
समग्र शिक्षा
सबको शिक्षा अच्छी शिक्षा

| अ.क्र. | विषय | एकक | भौतिक | मंजूर आर्थिक |
|---|---|---|---|---|
| १ | गणवेश | ६०० | २११७३० | १२७०३८००० |
| २ | बूट व पायमोजे | १७० | २११७८९ | ३६००४१३० |
| एकूण | | ७७० | | १६३०४२१३० |







शिक्षा मंत्रालय
MINISTRY OF EDUCATION
GOVERNMENT OF INDIA

Understanding Foundational Numeracy

# समग्र शिक्षा

## शिक्षण विभाग(प्राथ)

## जिल्हा परिषद,अहिल्यानगर

#NIPUNBHARAT

# निपुण भारत अभियान सुधारित उद्दिष्ट/पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान लक्ष्य

★ निपुण भारत अभियानामध्ये वर्षे ३ ते ८ वयोगट (पहिले ३ वर्षे बालवाटिका, इयत्ता पहिली व दुसरी) समाविष्ट असेल.

★ निपुण भारत अभियानामध्ये वर्षे ३ ते ८ वयोगट (पहिले ३ वर्षे बालवाटिका, इयत्ता पहिली व दुसरी) मधील सर्व विद्यार्थ्यांनी सन २०२६-२७ अखेर पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विषयक लक्ष्य प्राप्त करणे.

## बालवाटिका किंवा वयोगट पाच ते सहा वर्षे

### ✼ मौखिक भाषा ✼

- मित्र आणि शिक्षकांसोबत बोलतो.
- बडबड गीते कविता आकलनासह म्हणतो.

### ✼ वाचन ✼

- कुतूहलाने पुस्तक पाहतो आणि चित्रांच्या गोष्टी वाचण्याचा प्रयत्न करतो.
- काही परिचयाचे सतत दृष्षिपात येणारे / यमक जुळणारे शब्द (Sight words, डबे खाऊची वेष्टने यावरील शब्द ) याकडे लक्ष वेधण्यास सुरुवात करतो.
- अक्षरे आणि संबधित ध्वनी ओळखतो.
- कमीत कमी २-३ अक्षरापासून तयार केलेले शब्द वाचतो.

### ✼ लेखन ✼

- स्वअभिव्यक्तीसाठी गिरगिटतो / रेघोट्या मारतो / चित्र काढतो व रंगवतो
- ओळखण्या योग्य अक्षरे लिहिण्यास सुरुवात करतो
- पेन्सिलचा वापर करतो आणि ओळखण्यायोग्य अक्षरे लिहिण्यासाठी पेन्सिल योग्य प्रकारे धरतो.
- स्वतःचे नाव ओळखतो / लिहितो.

### ✼ संख्याज्ञान ✼

- वस्तूंची गणना करतो आणि नऊ पर्यंतच्या संख्या चिन्हांशी (Numerals) जोडी लावतो.
- नऊ पर्यंतचे अंक ओळखतो वाचतो आणि लिहितो.
- साधे आकृतिबंध ओळखतो पुनरावृत्ती करतो/रेखाटतो.
- दोन गटातील वस्तूंची त्यांच्या संख्येनुसार तुलना करतो या करिता च्या पेक्षा जास्त / कमी / समान इत्यादी शब्द वापरतो.
- संख्या/वस्तू/आकार/घटना यांची क्रमवार मांडणी करतो.
- निरीक्षणक्षम वैशिष्ट्यांच्या आधारे वस्तूंचे वर्गीकरण करतो आणि वर्गीकरण निकषांविषयी चर्चा करतो.
- त्याच्या /तिच्या सभोवतालच्या विविध वस्तूंच्या संदर्भात तुलनात्मक शब्द वापरतो. उदा. लांब-सर्वात लांब, उंच-सर्वात उंच, आखूड - सर्वात आखूड, पेक्षा जड/ पेक्षा हलका इत्यादी.

## इयत्ता पहिली किंवा वयोगट सहा ते सात वर्षे

### ✼ मौखिक भाषा ✼

- परिचित व्यक्ती, भोवतालचा परिसर गरजा याबद्दल मित्र व वर्ग शिक्षकांना प्रश्न विचारतो व संभाषण करतो
- शालेय परिसर/वातावरण व वर्गातील मजकूर समृध्द वातावरण याबद्दल बोलतो.
- बडबडगीते / कविता / गाणी साभिनय म्हणतो.

### ✼ वाचन ✼

- प्रकट वाचन/ कथाकथनात सक्रीय सहभाग घेतो, कथाकथना दरम्यान आणि नंतरच्या प्रश्नांना प्रतिसाद देतो. आवश्यक साहित्य/कठपुतळ्यांच्या सहाय्याने परिचित कथा, साहित्य इत्यादीचे सादरीकरण करतो.
- नवीन शब्दांचे वाचन करण्यासाठी ध्वनी आणि चिन्हे / प्रतीके यांचा वापर करतो.
- वयानुरूप अपरिचित मजकुरातील ४-५ सोप्या शब्दांनी तयार झालेली लहान वाक्ये वाचतो.

### ✼ लेखन ✼

- परिचित संदर्भाने येणाऱ्या शब्दातील मात्रा ओळखतो.(कथा,कविता,परिसरातील छापील मजकूर इ.) कार्य पुस्तिका,शुभेच्छा पत्र,वस्तूंची वा व्यक्तींची ओळखण्याजोगी चित्र काढतो तसेच त्यातून सुयोग्य असा प्रतीत होणारा अर्थ दर्शविण्यासाठी लेखन करतो.

### ✼ संख्याज्ञान ✼

- वस्तू मोजतो व २० पर्यन्त संख्या बोध (Number Sense) विकसित करतो.
- परिसरातील, आकारांचे आणि संख्यांचे सोपे आकृतिबंध ओळखतो आणि विस्तार करतो.
- दैनंदिन जीवनात ९ पर्यंतच्या संख्यांच्या बेरीज आणि वजाबाकीचा (२० पर्यंत उत्तर येईल) उपयोग करतो.
- त्याच्या/तिच्या सभोवतालच्या त्रिमितीय आकारांच्या (घनाकृती आकार) भौतिक गुणधर्मांच्या निरीक्षण आणि वर्णन करतो. उदा. वक्राकार / सपाट पृष्ठभाग, कोपरे आणि कडांची संख्या इत्यादी.
- अप्रमाणित/असमान एकाकांच्या सहाय्याने लांबीचा अंदाज व पडताळा घेतो उदा. वीत, पाऊल, बोटे इत्यादी तसेच अप्रमाणित/असमान एककांच्या सहाय्याने धाराकतेबाबत अंदाज व पडताळा घेतो उदा. कप, चमचा,मग इ.
- भारतीय चलनातील २० पर्यंतच्या नाणी व नोटा ओळखतो.

## इयत्ता दुसरी किंवा वयोगट सात ते आठ वर्षे

### ✼ मौखिक भाषा ✼

- वर्गात उपलब्ध असलेल्या मुद्रित सहित्याबद्दल बोलतो.
- प्रश्न विचारण्यासाठी संभाषणात व्यस्त राहतो व इतरांचे ऐकतो.
- कविता/गाणी म्हणतो.
- कथा/ कविता/मुद्रित साहित्यामध्ये येणाऱ्या परिचित शब्दांची पुनरावृत्ती करतो.

### ✼ वाचन ✼

- बालसाहित्य / पुस्तकातील कथांचे वर्णन करतो तसेच इतरांना सांगतो.
- दिलेल्या शब्दातील अक्षरे वापरून नवीन शब्द तयार करतो.
- वयानुरूप सोप्या शब्दांनी बनलेल्या ६ ते ८ वाक्यांचा अपरिचित मजकूर योग्य वेगाने, अचूकतेने, आकलनासह वाचतो.

### ✼ लेखन ✼

- स्वतः व्यक्त होण्यासाठी लहान / सोपी वाक्ये अचूकपणे लिहितो. सोपी ४ ते ५ अशी सुवाच्य वाक्ये लिहितो.

### ✼ संख्याज्ञान ✼

- वस्तू मोजतो व ९९ पर्यंत संख्याबोध (Number Sense) विकसित करतो.
- विविध आकार व संख्या यांपासून नवीन आकृतिबंध तयार करतो
- दैनंदिन जीवनात ९९ पेक्षा जास्त उत्तर येणार नाही अशा बेरीज व वजाबाकी या क्रियांचा वापर करतो.
- गुणाकार हा बेरजेची पुनरावृत्ती व भागाकार हा समान वाटप अथवा हिस्सा म्हणून करतो. तसेच गुणाकार तथ्ये (Multiplication Facts) समजून घेतो. (२,३ आणि ४ चे पाढे मदतीने )
- आयत,त्रिकोण,वर्तुळ,लांब वर्तुळ सारखे द्विमितीय आकार ओळखतो व वर्णन करतो.
- अप्रमाणित / असमान एकके वापरून लांबी, अंतर, धारकता यांचा अंदाज घेतो व मोजतो. उदा. काठी, पेन्सिल, धागा, पेला, चमचा, मग इत्यादी साधा तराजू वापरुन वजनाही तुलना करतो.
- जवळ/दूर, आत/बाहेर, च्या वर/च्या खाली, डावीकडे/उजवीकडे,पुढे/मागे वर/खाली या अवकाशीय संबंध दर्शविणाऱ्या शब्दांचा वापर करतो.
- १०० रु. पर्यंतची रक्कम वापरुन साधे व्यवहार करतो.

## निपुण शाळा घोषित करण्याचे निकष

### वर्ग पूर्व तयारी

- शिकण्याचे पूर्वनिर्धारित परिणाम साध्य करण्यासाठी शिक्षक स्वतःचे साहित्य तयार करतात किंवा उपलब्ध साहित्य, उपक्रम आणि कार्यपत्रिका, खेळणी इत्यादीं चा वापर करतात.
- लिखित मजकुराची जाण आणि साक्षरता कौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षक शब्द भिंती, गोष्टींची पुस्तके आणि भित्तीपत्रके यांच्या माध्यमातून वर्गात मजकूर समृध्द वातावरण तयार करतात.
- शिक्षक गणित पेटी, भाषा पेटी आणि राज्यस्तरावरुन प्राप्त इतर शैक्षणिक साधनांचा वापर करतात. मुले स्वतः साहित्य हाताळू शकतात. शिक्षक सुरक्षिततेची खात्री करतात.
- शिक्षक स्थानिक पातळीवर उपलब्ध साहित्य वापरतात (जे कमी किमतीचे किंवा बिनखर्ची आणि सहज उपलब्ध असते.)
- मुक्तखेळ,सामाजिक-भावनिक विकास कौशल्ये इ.ना प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षक विविध क्षेत्रातीलउपक्रमांची आखणी करतात. उदा. वाचन सर्जन इ. शिक्षक मुलांना दिसेल आणि सहज उपलब्ध होईल अशा पद्धतीने वर्गात साहित्य मांडणी करतात.
- शिक्षक मुलांच्या शिकण्याच्या पातळीचे मूल्यांकन क र त ा त आणि त्यानुसार वर्गातील अध्ययन कृतीं चे नियोजन/विकसन करतात.

### वर्गामध्ये

- बहुभाषिकतेचा वापर वर्गात संसाधन म्हणून केला जातो.
- घरगुती भाषा/मातृभाषेतून समृध्द स्थानिक परंपरांवर लक्ष केंद्रित करुन कला,कथा,कविता,यमक, खेळ,खेळणी, गाणी किंवा कृतींच्या माध्यमातून आनंददायक व अनुभवात्मक शिक्षणावर लक्ष केंद्रिंत करतात.(कला,खेळ, तंत्रज्ञान,कथाकथन,खेळणी,खेळ,कोडी इ.एकत्रित करणे)
- विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात सक्षम व्हावा यासाठी आंतर / बहुविद्याशाखीयता (म्हणजे इतर विषयांशी असलेला संबंध) लक्षात घेऊन वर्गातील व्यवहाराची वास्तविक जीवनातील परिस्थितीशी जोडणी करतात.
- वर्गात कृती/उपक्रम याद्वारे शिकण्याचा सराव केला जातो. यामध्ये पूर्व साक्षरता कौशल्ये(उदा.अक्षर ओळखणे आणि अक्षरांच्या आवाजांशी संबंध),पूर्व संख्या कौशल्य (उदा.संख्या मोजणी आणि तुलना),संज्ञानात्मक कौशल्य (उदा.नमुना ओळख वर्गीकरण इ.) आणि इतर प्रमुख कौशल्य जसे की सामाजिक कौशल्ये इ. मुख्य पैलूवर लक्ष केंद्रित केले जाते.
- वर्गात लिंग, अपंग इ. बाबत संवेदनशीलता दिसून येते मुलांच्या शिक्षणात त्यांच्या पालकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शिक्षकांकडून शालेयस्तरावर नियमितपणे
- पालक सभांचे आयोजन केले जाते.

### मूल्यांकन

- पायाभूत शिक्षणाबाबत मुलांच्या क्षमता आवडी आणि शिकण्याच्या शैली समजून घेण्यासाठी शिक्षक निरीक्षणाचा वापर करतात.
- निरीक्षणांच्या आधारे शिक्षक प्रत्येक क्षेत्रासाठी (विशेषतः प्रत्येक मूल साक्षरता आणि संख्याज्ञान कौशल्य) योजना आखतात.

National
Initiative for
Proficiency in Reading with
Understanding and
Numeracy
NIPUN BHARAT
(A National Mission on Foundational Literacy and Numeracy)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# निपुण प्रतिज्ञा

आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्वजण महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास पायाभूत शिक्षण कौशल्ये आत्मसात करण्यास उपयुक्त शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यास कटिबद्ध आहोत.

आपण सारे मिळून, आपल्या मुलांसाठी निखळ आनंददायी समृद्ध अनुभवाच्या संधी देणारी, अभिव्यक्तीचं आकाश खुलं करणारी, मुक्त छंद जोपासणारी, नेतृत्वाच्या संधी देणारी आणि आत्मसन्मान जपणारी शाळा निर्माण करूया.. आपण सारे मिळून अशी शाळा आणि घर बनवूया.. जिथे बालके अर्थपूर्ण वाचन, हेतुपूरक लेखन व गणिती व्यवहार प्रत्यक्ष जीवनात उतरवतील आणि आयुष्यभर विद्यार्थी राहतील...

अशाप्रकारे, महाराष्ट्रातील प्रत्येक बालकास आरोग्यदायी आणि आनंददायी शिक्षण देऊन 'निपुण बालक' घडविण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.